किंमत १० रुपये • पृष्ठे १०४ • फेब्रुवारी २०१६ • वर्ष ८ वे • अंक २

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

'पास्ट अँड प्रेझेंट' - सुहास बहुळकरांच्या चित्रांचे प्रदर्शन






विजय इंगळे यांना आप्पासाहेब पवार सूक्ष्मसिंचन पुरस्कार



नरेंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पाटणला शेतकरी मेळावा



'दिशा' - शरद पवार यांच्या व्यंग व अर्कचित्र पुस्तकाचे मराठी साहित्य संमेलनात प्रकाशन



# शेतीच्या नवीन वाणाच्या चाचण्या घेण्याचा अधिकार शास्त्रज्ञांना असलाच पाहिजे

## शरद पवार यांचे आग्रही प्रतिपादन

जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. जळगाव यांच्या वतीने सूक्ष्मसिंचनाच्या क्षेत्रात भरीव व मार्गदर्शक काम करणाऱ्या राज्यातील एका शेतकऱ्याला दर दोन वर्षांनी पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार कृषि व उच्च तंत्रज्ञान पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. हा समारंभ ९ जानेवारी २०१६ रोजी जळगावच्या जैनहिल्सवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जाणते लोकनेते शरद पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण.

राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्रीयुत देवेंद्र फडणवीस, याचे जलसंपदामंत्री आणि आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री युत गिरीष महाजन, ज्यांनी हा सोहळा या ठिकाणी योजित केला आणि पाण्याच्या क्षेत्रामध्ये एक नवीन दिशा दाखवली ते भवरलालजी जैन, महाराष्ट्राचे मराठीचे सुप्रसिद्ध कवी श्रीयुत ना. धों. महानोर, संसदेच्या सदस्या श्रीमती खडसे, व्यासपीठावर उपस्थित असलेले सर्व विधानसभा आणि विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य, आणि उपस्थित सहकारी


मुख्यमंत्री फडणवीस हे गांधी टोपी शरद पवार यांना घालून अमृतमहोत्सवानिमित्त त्यांचा सत्कार करताना.

बंधु-भगिनींनो.

आज आपल्या सगळ्यांच्या साक्षीनं विजयराव इंगळे की ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये काही नवीन दिशा आपल्या सगळ्यांना दाखवली त्यांचा गौरव पद्मश्री डॉक्टर आप्पासाहेब पवार आधुनिक कृषी उच्चतंत्र पुरस्कार देऊन या ठिकाणी केलेला आहे. संकट असतात पण संकटावर मात करण्याची भुमिका घेतली तर आपण पुढे जाऊ शकतो, नेमक हेच श्रीयुत इंगळे यांनी दाखवल. त्याच्यामुळे मी त्यांच मनापासून या ठिकाणी अभिनंदन करतो. हा जो त्यांना पुरस्कार मिळाला त्यामुळे साहजिकच एक प्रकारच समाधान आपल्या सगळ्यांना आहे. पण त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदा आपल्या परिसरामध्ये आपापल्या गावामध्ये हा अधिक कसा देता येईल? या दृष्टीकोनातून त्यांनी लक्ष केंद्रित केल तर माझी खात्री आहे की आताच मुख्यमंत्र्यांनी सांगितलेली जी समस्या आहे आणि नव्या पिढीमध्ये एक प्रकारच नैराश्य दिसत त्या नैराश्यातून त्या शेतकऱ्याला बाहेर काढण्यासंबंधीच काम आपण यशस्वीरीतीने करू शकू. आणि म्हणून या सगळ्या कामाला मी आपल्या सगळ्यांच्या वतीनं त्यांना अंतःकरणापासून शुभेच्छा देऊ इच्छितो.

अनेक गोष्टी या ठिकाणी करता येण्या सारख्या आहेत. शेतीच्या क्षेत्रामध्ये बदल होता आहेत, नवीन नवीन तंत्र येता आहेत त्या तंत्राचा उपयोग कसा करून घ्यायचा? या बद्दलचा प्रयत्न हा शेतकरी म्हणून आपण सगळ्यांनी केला पाहिजे. या सोहळ्याच्या निमित्तानं या ठिकाणी जो आलेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातला आपल्या सारखा शेतकरी यात मला आनंद आहे की याच्यामध्ये तरुणांची संख्या जास्त आहे. हा सगळा परिसर पाहिल्यानंतर माझी खात्री आहे तुम्हा सगळ्यांचा उत्साह वाढल्याशिवाय राहणार नाही. तुमच्या मनामध्ये कुठेतरी ही गोष्ट बसली असली की मी हे पाहतो आहे आणि इथे हे होऊ शकत तर माझ्याकडे का करता येत नाही? भांडवलाच्या गुंतवणूकीचा प्रश्न असेल, त्या संबंधी काय मार्ग काढायचा? त्या बद्दलचा प्रयत्न राज्यकर्ते आणि आमच्या सारखे जे लोक समाजामध्ये काम करतात


शरद पवार यांचा स्मृतिचिन्ह देऊन मुख्यमंत्री फडणवीस सत्कार करताना शेजारी भवरलाल जैन, ना. धों. महानोर, गुलाबराव पाटील, रक्षा खडसे, स्मिता वाघ व इतर मान्यवर.




श्री. शरद पवार यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त जैन इरिगेशनने एक खास म्युरल 'भुमिपूत्र' या नावाने तयार केले होते. ते या समारंभात दलूभाऊ जैन, गुरुमुख जगवाणी, विजय इंगळे, स्मिता इंगळे, शरद पवार, रक्षा खडसे, भवरलाल जैन, देवेंद्र फडणवीस, गिरीष महाजन,

ग्रांची ही जबाबदारी आहे. पण या जैन हिल्समध्ये जे आपण योग पाहिले, फळबागांच्या क्षेत्रामध्ये केलेल काम पाहिल, विविध प्रकारची बियाणं तयार करण्यासाठी जे कष्ट घेतले आपण पाहिले, त्यामधून काही ना काही प्रेरणा करून आपण आपल्या गावामध्ये आपल्या शिवारामध्ये सतत प्रयत्न करण्याबद्दलची भुमिका घेतली पाहिजे. यामधूच तुम्हाला समाधान मिळाल्याशिवाय राहणार नाही.

आज शेतकऱ्यांच्या समोरच प्रश्न बरेच असतील पण सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आपल्याला ही आहे की उत्पादनाचा खर्च कसा कमी करता येईल आणि दरहेक्टरी उत्पादन कस वाढवता येईल? आणि ही गोष्ट आपण केल्यानंतर मग नंतर प्रक्रिया मार्केटींग या संबंधीचे प्रश्न हे जरूर आपल्या पुढे येतील. पण आज उत्पादकता वाढवायची असेल तर संशोधनाला प्रोत्साहन देण्याची भुमिका घेतली पाहिजे. दहा वर्षांच्या पुर्वी आपला देश परदेशातून कापूस आयात करीत होता. बीटी कॉटन सारखी व्हरायटी आपल्याकडं विकसीत केली गेली. बाहेरच्या देशातून आणून विकसीत केली गेली. आणि आता आपण बघितल हा देश जगातला दोन नंबरचा कापूस निर्यात करणारा देश हा सगळ्या जगामध्ये ओळखता गेलेला आहे. हा कर्तृत्त्वाचा भाग जर कापूस उत्पादकांनी दाखवला तस ही नवीन व्हरायटी डेव्हलप करण्यासाठी या संशोधकांनी शास्त्रज्ञांनी प्रयत्न केले त्यांचही योगदान याच्यामध्ये आहे याच स्मरण हे आपल्या कराव लागेल. आणि हे जर आपण कापसाच्या बाबतीत करू शकतो तर बाकीच्या पिकांच्या बाबतीत का नाही करायच?

आज ऊसासारखं पीक आहे, महत्त्वाचा प्रश्न पाण्याचा आहे. कमी पाण्यामध्ये ऊस येईल का? या बद्दलचे प्रयोग जगामध्ये झालेले आहेत त्या प्रयोगाच्या संबंधीची नोंद घेऊन इथं आपण काही करू शकतो का? आपल्या ऊसामध्ये आपण काही परिवर्तन करू शकतो का? आज तस परिवर्तन इंडोनेशियासारख्या देशाने केल. जपानसारख्या देशातून त्याच वाण संशोधन करून आणल, आपल्या ऊसामध्ये ते मिक्स केल, आणि ज्या ऊसाला दहा दिवसांनी पाणी द्याव लागायच आज इंडोनेशियामध्ये चाळीस दिवसांनी पाणी दिल तरी ऊसाच्या उत्पादनात फरक पडत नाही हे चित्र त्या ठिकाणी बघायला मिळत. आणि हे इंडोनेशिया करू शकत असेल तर आपण या ठिकाणी का करायच नाही? आणि हे फक्त ऊसापुरत मी सीमीत म्हणत नाही जी जी महत्त्वाची पिकं आहेत आपल्याकडे त्या प्रत्येक पिकाच्या संबंधीच हा शोध करण्याच्या गोष्टीला प्रोत्साहन दिल पाहिजे. अनेक वेळेला




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री. पवार यांना प्रदान करण्यात आले. त्यावेळी व्यासपीठावर डावीकडून गुलाबराव पाटील, अनिल जैन, डॉ. सतीष पाटील, जयकुमार रावल, किशोर पाटील, शिरीष चौधरी व इतर मान्यवर.

अस काहीतरी नवीन करायला गेल्यानंतर आपल्याकडे त्याला विरोध केला जातो. मी परवाच माननीय मुख्यमंत्र्यांशी बोललो आणि मला आनंद आहे की त्याचा फेर विचार करण्याची भुमिका ही त्यांनी घेतली की महाराष्ट्रामध्ये जे काही नवीन संशोधन केल जात आणि त्या संशोधनामध्ये जेनेटिकली मॉडीफाईड पिकांसंबंधीचा विचार केला जातो त्याच्या ट्रायल घेण्यासाठीच्या सुद्धा आपल्या राज्यामध्ये बंदी आहे. शेतीच्या क्षेत्रामध्ये नवीन वाण शोधायचा, तो वाण योग्य आहे का नाही हे ट्रायल घेतल्याशिवाय कसे समजेल आपल्याला? आणि म्हणून त्याच्या ट्रायल घेणे हा अधिकार शास्त्रज्ञाचा असला पाहिजे, संशोधकाचा असला पाहिजे. आणि त्याबद्दल आज या ठिकाणी काही मर्यादा घातलेल्या आहेत त्या मर्यादांच्या संबंधीचा हा फेरविचार करण्याची गरज आहे.

मी या गोष्टीशी शंभर टक्के सहमत आहे की एखादा संशोधक हे लोकांच्या पर्यंत पोहोचवायच्या पुर्वी त्याचा विपरीत परिणाम मातीवर होतो का नाही? पाण्यावर होतो का नाही? अन्य पिकांवर होतो का नाही? गुरा-ढोरांवर होतो का नाही? मनुष्यप्राण्यावर होतो का नाही? या सगळ्या गोष्टींची बारकाईन तपासणी करावी लागेल. आणि याची पुर्ण खात्री पटल्याशिवाय त्या नवीन जातीला संधी देता कामा नये. ती काळजी घेण्याबद्दल कोणतीही तडजोड नाही.

आताच मुख्यमंत्र्यांनी सांगितल सोयाबीनच्या संबंधीचे प्रश्न आहेत. आज जगामध्ये अमेरिका, ब्राझील, कॅनडा, या तीन देशांनी सोयाबीनच्या बाबतीत क्रांती केली. त्याच महत्त्वाच कारण सार्वजनिक व्हरायटी डेव्हलप करण्याबद्दलची खबरदारी ही त्या देशांनी घेतली आणि जगातले मोठे निर्यातदार म्हणून ते देश त्या ठिकाणी ओळखले जातात. आज तेच काम करायला आपल्या देशामध्ये परवानगी नाही. पण आपण जवळपास वीस हजार कोटी रुपयाच सोयाबीनच ऑईल त्याच अमेरिकेतनं, त्याच कॅनडामधनं, त्याच ब्राझीलमधनं आयात करतो. ते सगळ आयात केलेल तेल हे सार्वजनिक क्रॉपपासून तयार झालेल, बीटी कॉटनपासून तयार झालेल हे या ठिकाणी येत. म्हणून त्यांच तेल खायला आम्हाला अडचण नाही पण माझ्या शेतकऱ्याला त्या संबंधीच पिक घ्यायला मात्र अडचण आहे ही गोष्ट मला स्वतःला अस वाटत की आता फेरविचार करायची गरज आहे. आणि म्हणून जे जे शेतकऱ्याच्या हिताच आहे, जे जे समाजाच्या हिताच आहे, जे जे मानवी समाजाला अपायकारक नाही, जे जे वातावरणाला पोषक आहे त्या सगळ्या गोष्टीच काम आणि संशोधन हे करण्यासंबंधीचा अधिकार हा संशोधकांना असला पाहिजे आणि संशोधकांची



त्री झाल्यानंतर ते शिवारात न्यायचा अधिकार शेतकऱ्यांचा असला पाहिजे.

माझी खात्री आहे की महाराष्ट्रामध्ये या बंधीचे धोरणात्मक बदल हा करण्यासंबंधीची चाराची प्रक्रिया ही सुरू झालेली आहे. आणि या राज्याच्या या मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून पद्धतीचे प्रयोगशील काम जे शेतकऱ्यांच्या आणि संशोधकांकडून होत आहे, शास्त्रज्ञांकडून लं जातं आहे त्याला उत्तम प्रकारची साथ ही ली जाईल, अशा प्रकारचा विश्वास या ठिकाणी ाळगतो. आज शेतीमालाच्या किंमतीचा प्रश्न द्धा ऐरणीवर आला आहे. यंदाच्या वर्षी वळपास सगळ्या शेतीमालाच्या किमतीला क प्रकारचा धक्का बसला आहे. पाच हजार पयानी जाणारा कापूस हा अडोतीसशे रुपये, स्तीसशे रुपयांवर जाऊन पोहोचला. मी स्वतः केळीच पिक घेणारा आहे. गेल्या वर्षी, गेल्याच्या गेल्या वर्षी, आज ज्या केळीला, माझ्या स्वतःच्या केळीला जिथे अकरा रुपयाचा भाव मिळत होता सध्या मी ते अडीच रुपयांनी विकतो आहे. आणि त्यामुळे साहजिकच त्याचे परिणाम काय होतात हे मी तुम्हाला सांगायच काही कारण नाही. पण याचा विचार निव्वळ सरकारनी केला पाहिजे अस नव्हे तर आपल्याला सुद्धा बसून विचार करावा लागेल. त्याचा उत्पादनखर्च कसा कमी करता येईल? त्याची उत्पादकता कशी वाढवता येईल? त्याच्यावर प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने काही करता येईल का? केवळ देशाच आणि जगाच मार्केट हे मिळवण्याच्या दृष्टीकोनातून काय करता येईल? या सगळ्या गोष्टींचा विचार हा एकत्रित बसून आपल्याला करावा लागेल. आणि माझी खात्री आहे की विशेषतः केळीच्या संदर्भात अत्यंत बारकाईनं अभ्यास करणारा शेतकरी आज महाराष्ट्रामध्ये कुठं असेल? तर तो जळगाव जिल्ह्यामध्ये आहे. आणि त्यामुळं इथल्या सुविद्य शेतकऱ्यांनी या क्षेत्रामध्ये काही बदल करण्याबद्दलची शक्यता आहे, या पद्धतीच्या कामामध्ये लक्ष घातल पाहिजे. विद्यापीठं आणि संशोधक या सगळ्यांची साथ राज्यसरकार तुम्हाला मिळवून देईल पण हे काम संयुक्तपणानी केल पाहिजे आणि त्या बाबतीत तुम्ही तयारी ठेवा. माझी खात्री आहे यातून आपण काहीतरी मार्ग काढू शकू.

मी काही अधिक वेळ घेऊन आपल्या सगळ्यांचा वेळ घेऊ इच्छित नाही. पण आता वर्ष गेल, पुढच वर्ष हे चांगल



येईल अस दिसत आहे. जुन महिन्यामध्ये चांगला पाऊस पडणार आहे अस जगातल्या तज्ज्ञांनी सांगितल आहे. मी काही ज्योतिषी-बितीशी नाही. मी शास्त्रज्ञांचा सल्ला घेतो. आणि शास्त्रज्ञांच मत अस आहे की पुढच्यावर्षी पाऊसकाळ या देशामध्ये चांगला आहे. आणि त्यामुळे त्यांचा शब्द खरा ठरला आणि पाऊसकाळ चांगला झाला तर त्या परिस्थितीवर मात करण्याची बहादुरी आमच्या शेतकऱ्यांच्या मनगटामध्ये आहे त्याच्याबद्दल माझ्या मनामध्ये काही शंका नाही. फक्त आम्ही जे पिकवतो त्याला उत्तम प्रकारची बाजारपेठ मिळवण्यासाठी जे जे कोणी जबाबदार असतील त्या सगळ्यांची साथ ही त्या ठिकाणी मिळेल अशा प्रकारची अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो. भवरलालजींना पुन्हा एकदा धन्यवाद देऊन त्यांच अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



## जळगाव जिल्ह्याच्या वतीने सत्कार

जळगाव जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाटील, विधानसभेचे माजी अध्यक्ष अरूण गुजराथी, माजी मंत्री गुलाबराव देवकर, माजी आम दार शिवाजीराव देशमुख व इतर प्रमुख कार्यकर्त्यांनी अमृतम होत्सवानिमित्त मोठा गुलाबपुष्पहार घालून श्री. शरद पवार यांचा यावेळी एका स्वतंत्रपणे झालेल्या समारंभात सत्कार केला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना श्री. शरद पवार म्हणाले की, एक काळ असा होता जेव्हा मी महाराष्ट्रातील तरुणांमध्ये काम करीत होतो तेव्हा प्रत्येक गावात जात होतो. गावोगाव फिरण्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न लक्षात यायचे. त्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करायचो. तेव्हा एक प्रकारची आपुलकी लोकांमध्ये दिसायची. ती आजही मी अंतःकरणात साठवून ठेवलेली आहे. त्याची पुन्हा एकदा फेरउजळणी करावी असे मनात आहे. त्यादृष्टीने धुळे, जळगाव, नंदूरबार या जिल्ह्यांचा तालुका पातळीवरून दौरा करावा, कार्यकर्त्यांना भेटावे असे बरेच दिवसांपासून माझ्या मनात आहे. आपण लोकांमध्ये मिसळलो, त्यांना भेटलो तर ते निष्ठेने पाठीशी उभे राहतात असा माझा अनुभव आहे. आज शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. दुष्काळाचा सामना त्यांना करावा लागतो आहे. या कामात त्यांच्या पाठीशी पक्षाच्या राज्य संघटनेची ताकद उभी करण्याचा माझा प्रयत्न आहे. तशी सूचना प्रदेश पदाधिकाऱ्यांना दिली आहे.



# शेतीवरची संकटे कमी करण्यासाठी शेतकऱ्याला शाश्वत पाणी, वीज व तंत्रज्ञान देणे गरजेचे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उद्‌गार

पद्मश्री आप्पासाहेब पवार कृषी तंत्र पुरस्काराच्या या कार्यक्रमामध्ये आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, माझे सहकारी मंत्री श्री. गिरीषजी महाजन ज्यांना आपण मोठेभाऊ म्हणून ओळखतो ते सन्माननिय भवरलालजी जैन, श्रेष्ठ कवी ना.धों. महानोर, आजचे पुरस्कार विजेते आणि ज्यांच्या छोट्याशा भाषणातनं खऱ्या अर्थानं एक व्यक्ती मोठा कसा असतो हे आपल्याला पाहायला मिळाल ते सन्माननिय श्री. विजय इंगळे त्यांच्या सौभाग्यवती, मंचावर उपस्थित खासदार रक्षाताई खडसे, आमचे सहकारी आमदार हरीभाऊजी जावळे, गुलाबरावजी पाटील, सुरेशजी भोळे, किशोरजी पाटील, जयकुमारजी रावल, स्मिताताई वाघ, शिरीषजी चौधरी, गुरूमूखजी जगवाणी, या ठिकाणी जैन परिवारातील सर्व सदस्यगट, आणि उपस्थित सर्व शेतकरी भगिनी आणि बंधुंनो.

मी सर्वप्रथम आपल्या सर्वांचे आणि विशेषतः आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननिय पवारसाहेबांचे या ठिकाणी मनः पुर्वक त्यांची दिलगीरी व्यक्त करतो की या कार्यक्रमाला आम्ही बरच उशीरा पोहोचलो आणि यापूर्वी आपल्या गिरीषजींनी एक मोठा महा आरोग्य मेळावा या ठिकाणी आयोजित केला होता आणि त्याची भव्यता इतकी मोठी होती की त्या भव्यतेत आम्ही हरवून गेलो, आणि त्यामुळे तिथे आम्हाला बराच वेळ लागला आणि आपल्याला सगळ्यांना या ठिकाणी वाट पाहावी लागली. आम्ही तिथे असताना हा कार्यक्रम सुरू होऊ नये ही

पण खबरदारी गिरीषभाऊंनी घेतली होती कारण ज्या निवेदीका इथे निवेदन करता आहेत त्या कार्यक्रमाच्या निवेदीका देखील त्याच होत्या. त्याच्यामुळे त्या देखील आमच्यासोबतच या ठिकाणी पोहोचल्यात. पण आज इतका वेळ पवारसाहेबांना वाट पाहावी लागली आणि आपल्या सगळ्यांना वाट पाहावी लागली त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो.

खर म्हणजे आज हा जो पुरस्कार आपण या ठिकाणी देतो आहोत आणि ज्याप्रकारे इंगळेसाहेबांनी आपल्यासमोर एक अतिशय चांगल उदाहरण प्रस्तुत केल आहे. विदर्भाच नाव घेतल आणि कपाशीच नाव घेतल की गेले १५-२० वर्ष फक्त आत्महत्या करणारा शेतकरी हेच चित्र आपल्या डोळ्यापुढे येत. पण अशाही परिस्थितीमध्ये आपल्या स्वतःच्या कर्तृत्वानं आपण परिस्थितीवर मात करू शकतो हे या ठिकाणी विजयराव इंगळे यांनी दाखवल म्हणून आपल्या सगळ्यांच्या वतीनं मी अतिशय मनःपुर्वक अभिनंदन त्यांच या ठिकाणी करतो. (टाळ्या) आणि त्या सोबत मी भवरलालजींच मनःपुर्वक या ठिकाणी अभिनंदन करतो की त्यांनी एक अतिशय चांगला स्वर्गीय पद्मश्री आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार या ठिकाणी ठेवला. खर म्हणजे आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे की आप्पासाहेब असतील किंवा शरदराव असतील खुप शेतीच्या क्षेत्रामध्ये पहिल्यापासून त्यांना रस आहे आणि बारामतीमध्ये त्यांनी प्रतिष्ठान सुरू करून त्या माध्यमातनं शेतीमध्ये नवनवीन प्रयोग कसे करता येतील? शेती ही आधुनिक कशी करता येईल?, शेती परवडणारी कशी करता येईल?, नव्हे तर तो फायद्याचा व्यवसाय कसा करता येईल? अशा प्रकारचे अनेक प्रयोग हे त्याठिकाणी त्यांनी केले आणि देशाचे कृषिमंत्री म्हणून पवारसाहेबांनी खुप मोठ्या प्रमाणात असे प्रयोग सामान्य शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचतील? हा प्रयत्न देखील केला.

आता आप्पासाहेबांच्या नावानी हा पुरस्कार या ठिकाणी दिला जातो आहे याला याकरीता महत्त्व आहे की शेती क्षेत्रामध्ये नवीन तंत्रज्ञान आल पाहिजे या करीता त्यांनी आपल्या जीवनाचे अनेक वर्ष त्याठिकाणी खर्च केले आणि आज आपल्याला माहिती आहे की जैन इरिगेशननी केवळ जळगावमध्येच नाही, भारतामध्ये नाही तर अनेक देशांमध्ये आज ज्याप्रकारे कृषीतंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये काम केल आहे. म्हणजे ज्यावेळेस मी इस्त्राईलला गेलो आणि तिथल्या कृषीप्रदर्शनात त्याठिकाणी उद्घाटन करण्याची संधी मला मिळाली आणि त्याचवेळी मी जैन इरिगेशनच्या स्टॉलच देखील त्याठिकाणी उद्घाटन केल आणि इतक बर वाटल की आपल्या देशातली आपल्या महाराष्ट्रातली एक कंपनी जगातल्या शंभर देशांमध्ये त्या ठिकाणी पोहोचते आणि एवढच नाही तर ज्या वेळी आम्ही तिथल्या एका किबूत्झमध्ये गेलो नानदानजैन असा तो किबूत्झ आहे ज्याची आता जवळजवळ सगळी मालकी ही जैन समुहाची आहे. त्या ठिकाणी गेल्यानंतर खऱ्या अर्थानं शेतीमध्ये काय केल जाऊ शकत? याचे जे प्रयोग त्याठिकाणी आपल्याला पाहायला मिळाले मला अस वाटत की शेतीसमोरच्या ज्या समस्या आहेत त्या समस्यांची उत्तरं शोधण्याच काम हे जैन समुहानी याठिकाणी केल आहे. आणि म्हणून मला अस वाटत पुरस्कार देणारे, पुरस्कार घेणारे आणि ज्यांच्या नावानी पुरस्कार दिला जातो आहे ते असे तिघंही खऱ्या अर्थानं या ठिकाणी शेतीच्या क्षेत्राला एक दिशा देणारे आणि त्यात अमुलाग्र बदल करणारे असल्यामुळे मला अस वाटत की या पुरस्काराच महत्त्व हे अत्यंत मोठ आहे. विशेषतः ज्याचा मी उल्लेख केला की गेल्या अनेक वर्षांमध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये खुप स्थित्यंतर आपण बघितली. विदर्भामध्ये, मराठवाड्यामध्ये, उत्तर महाराष्ट्राच्या काही भागामध्ये आपल्याला एक आत्महत्यांच सत्र देखील पाहायला मिळत आहे आणि एकीकडे इंगळेजींसारखा एक शेतकरी आपल्या कर्तृत्त्वावर त्या ठिकाणी शुन्यातून विश्व निर्माण करतो आहे. दुसरीकडे त्याच वेळी त्याच जिल्ह्यामध्ये काही शेतकरी छोट्या छोट्या गोष्टींकरीता त्या ठिकाणी





ात्महत्त्येला प्रवृत्त होता आहेत. विजेच कनेक्शन मिळाल ाही यामुळे किंवा कर्जबाजारी झालो यामुळे अशा वेगवेगळ्या ारणांनी त्यांना त्या ठिकाणी खऱ्या अर्थानं आत्महत्या करावी ागते आहे आणि म्हणून मला अस वाटत की शेतीच्या क्षेत्राकडे ार म्हणजे आपला बघण्याचा जो दृष्टीकोन आहे त्याला कुठेतरी ापल्याला आता आधुनिकतेची जोड द्यावी लागेल. विशेषतः ापण जर विचार केला तर ज्या प्रकारे वातावरणातला बदल ापल्याला पाहायला मिळतो आहे, आपल्याला कल्पना आहे ली चार वर्ष कमीअधिक प्रमाणात महाराष्ट्रामध्ये दुष्काळ आहे.

गेल्या दोन वर्षांत तर मागच खरीपाच पिक गेल, मागच ब्बीच पिक गेल. या वर्षाच खरीपाच पिक गेल, या वर्षाच ब्बीच पिक गेल. सातत्याने शेतकऱ्यावर त्या ठिकाणी संकट ता आहेत. आणि आपण जर बघितल तर जोपर्यंत आता ा शेतीला आपण क्लायमेटप्रूफ करणार नाही, वातावरणातल्या दलाकरीता आपण शेती क्षेत्राला उभ करणार नाही तोपर्यंत अशा कारच्या पावसावर अवलंबून असलेल्या आपल्या शेतीतून ाज आपल्या शेतकऱ्याच्या हाती काही पडेल अशा प्रकारची वस्था नाही. आपण बघितल या वर्षी देखील जुन-जुलैला ागवेगळ्या ठिकाणी अतिशय जोरदार पाऊस आला, आणि ो पाऊस आल्यानंतर आमच्या शेतकऱ्याला अस वाटल की ाता चांगला पाऊस झाला आहे आपण पेरणी करू. पण पेरण्या ाल्यानंतर चाळीस दिवस पाऊसाचा खंड पडला. त्यानंतर पुन्हा ाऊस आला पुन्हा काही लोकांना पेरण्या करण्याचा प्रयत्न केला. पुन्हा वीस दिवस पाऊस त्या ठिकाणी निघून गेला आणि यानंतर जेव्हा थोडाफार पाऊस आला त्यावेळी जवळजवळ ारीप हंगाम संपला होता. एकुण वातावरण अस होत की शेतकऱ्याला काही त्या ठिकाणी पिक घेता येईल अशा प्रकारची अवस्था उरली नव्हती.

पिण्याच पाणी मिळाल आणि जनावराला चारा मिळाला तरी पुष्कळ आहे अशा प्रकारच्या मानसिकतेत तो शेतकरी पोहोचला होता. आता सातत्याने जर ही अवस्था येत असेल, आज आपल्याला माहिती आहे की आपली शेती मोठ्या प्रमाणात कोरडवाहू आहे, मग अशा या शेतीमध्ये आपल्याला त्या शेतीला शाश्वत कस करता येईल? या कडे विशेषत्वाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

आज ज्यावेळी या ठिकाणी इंगळेजींनी आपल्या शेतीमध्ये प्रयोग केले. विशेषतः पाण्याच व्यवस्थापन म्हणजे त्यांच एक वाक्य मला फार आवडल की त्या काळात त्यांचे वडील अस म्हणाले की अरे स्प्रिंकलर स्प्रिंकलरनी होणार नाही त्याच्या पलिकडची टेक्नॉलॉजी काय आहे? त्याच्याकडे तु लक्ष दे त्याच्या पलिकडे आपल्याला काय करता येईल? ही जी दृष्टी आहे ती दृष्टी त्या ठिकाणी त्यांच्या वडीलांनी त्यांना दिली. आणि मला अस वाटत की तिच दृष्टी घेऊन ते आज इथपर्यंत पोहोचले आहेत आणि म्हणून मला अस वाटत की जोपर्यंत आपण शेतकऱ्याला शाश्वत पाणी, शेतकऱ्याला शाश्वत वीज आणि शेतकऱ्याला नवीन तंत्रज्ञान देणार नाही तोपर्यंत या शेतीवरच संकट हे आपण दूर करू शकणार नाही.

दुर्दैवाने आपण जर बघितल तर आपल्या सगळ्या शेतीच्या क्षेत्रामध्ये आपण मदतीपोटी रिलीफच्या पोटी हजारो कोटी रुपये खर्च करतो पण शेती क्षेत्रातली जी आपली गुंतवणूक आहे ही गुंतवणूक अत्यंत कमी आहे. आपल्या शेती क्षेत्रातली जी मुलभूत गुंतवणूक आहे मग ती पाण्याकरीता असेल, ती

वीजेकरीता असेल, ती वेगवेगळ्या प्रकारचे त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर करण्याकरीता असेल, ड्रीपसारख्या व्यवस्था उभ्या करण्याकरीता असेल किंवा चांगल्या प्रकारची बियाणं मिळावी या करीता व्यवस्था उभी करण्याचा विचार असेल, अशा वेगवेगळ्या गोष्टींकरीता आपण जी गुंतवणूक केली पाहिजे आणि त्यासोबत त्याला एक प्रोसेसिंगच्या माध्यमातून एक जी व्यापारपेठ त्याला उपलब्ध करून दिली पाहिजे याकरीता कुठेतरी आपण कमी पडतो आहोत. आणि मला अस वाटत सहा-सहा, सात-सात, आठ-आठ लाख कोटी रुपये हे आपण कृषीकर्जाला देतो पण त्या ठिकाणी कृषी क्षेत्रातल्या गुंतवणूकीकरीता मात्र आपण जो पैसा उपलब्ध करून देतो तो त्याच्या दहा टक्के देखील देत नाही. जोपर्यंत ही गुंतवणूक आपली वाढणार नाही तोपर्यंत शाश्वत शेतीकडे जाण्याचा आपला जो प्रवास आहे किंवा निसर्गाच्या कोपामुळे जे शेतीवर परिणाम होतात त्या परिणामांना आपण दूर करू शकणार नाही. आणि म्हणून राज्यसरकारच्या वतीनं देखील असेच अनेक प्रयत्न आपण करतो आहे.

आज या निमित्याने मी जैन इरिगेशनच मन:पुर्वक अभिनंदन करीन आणि आभार देखील मानीन की आज आमचा जो संत्रा उत्पादक जो शेतकरी आहे याच्यावर मोठ संकट, या वर्षी चेन्नईला मोठा पाऊस झाला, बांगलादेशमध्ये थोडाफार एक्स्पोर्ट होत होता तिथे अडचण आली, आंध्रप्रदेशमध्ये संत्रा जाऊ शकला नाही, आणि अक्षरशः रस्त्यावर संत्री फेकायची वेळ आली. आणि म्हणून आम्ही असा प्रयत्न केला की संत्र्यावर प्रोसेसींग झाले पाहिजे. आणि केवळ प्रोसेसींग करून चालत नाही तर त्याच्याकरीता जोपर्यंत आपण ब्रँड तयार करीत नाही तोपर्यंत त्याला मार्केट मिळत नाही. बिना ब्रँडच आज मार्केट



उपलब्ध होत नाही आणि म्हणून ज्या वेळी त्या संदर्भात मी कोकाकोला कंपनीशी बोललो, त्यानंतर जैन इरिगेशनशी बोलण झाले आणि आज कोकाकोला आणि जैन इरिगेशन एकत्रीत येऊन त्या ठिकाणी आपल्या मोर्शीमध्ये संत्र्यावर प्रक्रिया करण्याकरीता एक उद्योग त्या ठिकाणी लावता आहेत. आणि सगळा संत्रा विकत घेऊन त्याचा रस काढणे, त्याचे वेगवेगळे उपपदार्थ तयार करणे आणि या सोबत जो राज्यसरकारचा एक ब्रँड आहे तो ब्रँड नोगा, तो ब्रँड आणि कोकाकोला अस एक संयुक्तित ब्रँड तयार करून त्यातनं त्याच्या मार्केटींगची व्यवस्था करता आहेत आणि एवढच नाही तर आपल्या संत्र्याची जी काही आज अवस्था आहे ती बदलली पाहिजे. कारण आपल संत्र आपल्याला माहिती आहे ते टेबलफ्रूट आहे आणि त्याच्या ज्या बिया आहेत किंवा त्याच्यामध्ये ज्या काही व्हरायटीज् आहेत याच्यामध्ये ज्यूसींग करताना थोडा कडवटपणा येतो मग त्या करीता नवीन व्हरायटी कशी तयार करता येईल? याच एक संपुर्ण तंत्रज्ञान हे त्याठिकाणी ते आणता आहेत. आणि अतिशय चांगल्या प्रकारे शेतकऱ्यांना ते तंत्रज्ञान देऊन आणि त्यातून नवीन व्हरायटीज् तयार करायच्या अशा प्रकारचा प्रयोग आज त्यांनी त्या ठिकाणी सुरू केला आहे. मला अस वाटत की अशा प्रकारचे अनेक प्रयोग हे आपल्याला करावे लागतील. यावर्षी आपण बघितल की विशेषत्वाने अनेक ठिकाणी सोयाबीनचा उतारा आला नाही आणि त्याच्या कारण काय आहे? तर अस लक्षात आल की सोयाबीनचा जो वाण आपल्याला उपलब्ध आहे, आता जी वातावरणातली परिस्थिती आहे जी क्लायमेटीक कंडीशन आहे त्याच्यामध्ये तो उतारा येण कठीण आहे. आणि मग त्याचा चांगला वाण आला पाहिजे, त्याचा नवीन वाण आला पाहिजे याकरीता आपल्याला कुठेतरी त्याच्यात लक्ष घालाव लागेल.

आज खाजगी क्षेत्रामध्ये अनेक कंपन्या आहेत, रुचीसोया सारखी कंपनी जी मध्यप्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणात नवीन वाण उपलब्ध करून देते आणि अडीच-तीन लाख शेतकऱ्यांकडून सगळा सोयाबीन विकत घेते आणि त्याच प्रोसेसिंग करते. आपल्याही राज्यामध्ये ते करता आलं पाहिजे याकरीता आम्ही त्यांच्या सोबत करार केला आणि त्या माध्यमातून त्याची संपुर्ण प्रक्रिया या ठिकाणी कशी आपल्याला करता येईल हा ही प्रयत्न आम्ही सुरू केलेला आहे.

मला अस वाटत की हे सगळे प्रयत्न करीत असताना आज शेतकऱ्याला जर आपल्याला दिलासा द्यायचा असेल आणि या दुष्काळाच्या दुष्ट चक्रातून त्याला सोडवायच असेल तर त्याच्याकरीता पाण्याची

व्यवस्था केली पाहिजे. माझ आज जलयुक्त शिवाऱ्याच्या माध्यमातनं विकेंद्रित पाण्याचे साठे तयार करण्याच काम आपण सुरू केल आणि या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी स्वतः सहभागी होऊन त्यातून मोठा पाण्याचा साठा तयार केला.

आपल्याला माहिती आहे अनेक ठिकाणी या वेळेस रब्बीच्या हंगामामध्ये आपल्याला जलयुक्त शिवाराच्या कामातून त्या ठिकाणी शाश्वत अशा प्रकारच सिंचन हे देता आलं. मला अस वाटत की या क्षेत्रामध्ये राज्यसरकारने तर आतापर्यंत प्रयत्न केलाच आहे पण याच्या सोबत केवळ सिंचन करून चालणार प्रकारचा प्रयत्न हा या ठिकाणी करण्याची आवश्यकता आहे आणि मला विश्वास आहे की इतके प्रयोग या ठिकाणी केले आहेत. इथल्या आंब्याच जे प्रोसेसिंग होत, खर म्हणजे आता आंबा हा कोकणामध्ये, आंबा हा साऊथमध्ये, पण तिकडचा साऊथचा आंबा आणून या ठिकाणी ते ज्या प्रकारच प्रोसेसिंग ते करता आहेत ते पाहून मी आश्चर्यचकित झालो आणि त्यांना विनंती केली की आमच्या कोकणातल्या आंब्यावर देखील तुम्ही प्रोसेसिंग या ठिकाणी केल पाहिजे आणि मला सांगताना आनंद वाटतो की त्यांनी तातडीनं सांगितल की आम्ही त्या ठिकाणी




नाही, पाणी ही इकोनॉमिक कमोडिटी आहे हेही आपल्याला समजून घ्याव लागेल. आणि त्यामुळे त्याचा वापर अनिर्बद्ध करता येणार नाही आणि तो वापर जर नियंत्रित करायचा असेल तर त्याकरीता आपल्याला तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल.

मी मागच्या काळामध्ये अनिलभाऊ, अशोकभाऊंशी बोललो आणि त्यांना अस सांगितल की महाराष्ट्राकरीता प्लॅन तयार करा की कशा प्रकारे आपल्याला फेजआऊट करून महाराष्ट्रामध्ये म्हणजे आज एक जैन इरिगेशन आल तर आपण जळगाव जिल्ह्यामध्ये कुठेही जा आपल्याला ड्रीपची शेती त्या ठिकाणी पाहायला मिळते. तसाच एक आपल्याला बृहत आराखडा महाराष्ट्राकरीता कसा तयार करता येईल? अशा कोकणामध्ये अशाच प्रकारच तिथल्या आमच्या हापूसवर त्या ठिकाणी प्रोसेसिंग करण्याच एक युनिट हे त्या ठिकाणी सुरू करू. मला अस वाटत जागा देखील त्यांनी त्या ठिकाणी बघितल्या आहेत आणि त्यातली जागा फायनल झाल्यानंतर त्याचही प्रोसेसिंग त्या ठिकाणी होईल. जोपर्यंत कृषी मालावर प्रक्रिया आणि नवीन तंत्रज्ञान हे आपण वापरणार नाही तोपर्यंत हे परिवर्तन आपल्याला करता येणार नाही. आणि हे सगळ करण्याकरीता आज आपल्याला खऱ्या अर्थानं कृषीदुतांची आवश्यकता आहे. आणि हे कृषीदुत कोण होऊ शकतात? तर विजयराव इंगळेंसारखे शेतकरी हे खऱ्या अर्थानं कृषीदुत होऊ शकतात की ज्यांनी आपल्या कर्तृत्वातून हे साम्राज्य उभे करून

दाखवले आणि ते माझ्या सारखा व्यक्ती जो या ठिकाणी भाषण करतो त्याच्या भाषणापेक्षा ज्यानी करून दाखवलेल आहे, त्यांनी जर शेतकऱ्यांना सांगितल आणि ते तस काम करतातच आहेत. तर मला अस वाटत की त्यातनं निश्चितपणे निराशा दूर होईल आणि आपला शेतकरी हा प्रयोगाकरीता तयार होईल. त्याकरीता मी त्यांना विनंती करतो ते हे काम तर करताच आहेत पण राज्याशासनाच्या वतीने मी त्यांना विनंती करतो की आपल्या सारख्या व्यक्तीनी कृषीदुत म्हणून काम करावे आणि वेगवेगळ्या शेतकऱ्यांना आणि विशेषतः आपल्या कपाशीच्या शेतकऱ्यांना जर प्रयत्न केला, समोर बसलेले सगळे शेतकरी प्रगतिशील शेतकरी आहेत या सगळ्यांनी मिळून जर प्रयत्न केला तर कृषी क्षेत्रावरच्या या संकटातून आपण निश्चिपणे त्या ठिकाणी बाहेर पडू शकू.

आज या निमित्ताने अतिशय चांगले मार्गदर्शन हे विजयरावांनी केलेल आहे आणि त्याच सोबत त्यांचा संवेदनशील अशा प्रकारच जे मन आहे ते केवळ शेतकरी नाही तर ते कवी देखील आहेत आणि त्याच्यामुळे ते मन देखील त्यांनी या ठिकाणी मोकळ केले. मला विश्वास आहे की आकाशात



अकोला येथील प्रगतशील शेतकरी विजय इंगळे व त्यांच्या पत्नीचा मुख्यमंत्री फडणवीस शाल, सन्मानचिन्ह, दोन लाख रुपये देऊन सत्कार करताना. शेजारी (डावीकडून) स्मिता वाघ, रक्षा खडसे, ना. धों. महानोर, शरद पवार, भवरलाल जैन, हरिभाऊ जावळे, गिरीश महाजन, डॉ. सतीश पाटील, जयकुमार रावल व इतर मान्यवर.

त्या ठिकाणी जाऊन आपण पंचविस-तीस क्विंटल अगदी आपण ज्यावेळी पाऊस नाही पाणी नाही अशावेळी देखील चोवीस-पंचविस क्विंटल पर्यंत त्या ठिकाणी उतारा घेतला तसाच उतारा आमच्या इतर शेतकऱ्यांना कसा घेता येईल? या संदर्भातल मार्गदर्शन आपण करावे. त्याकरीता आमच कृषीखात देखील पुढाकार घेईल आणि आपला संवाद जास्तीतजास्त शेतकऱ्यांशी झाला पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आपण करू. चांगल तंत्रज्ञान चांगल्या गोष्टी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आपण सगळे मिळून करू आणि मला विश्वास आहे की आपण सगळ्यांनी बसलेले आपले जे वडील आहेत त्यांचा आशिर्वाद आपल्याला निश्चितपणे नेहमीच लाभत राहील. आणि आपल्या जीवनात अशीच प्रगती होत राहील हा विश्वास या निमित्त्याने व्यक्त करतो. केळीच्या संदर्भात आपण यापुर्वीच आंगणवाडीमध्ये त्याचा समावेश आणि आपल्या पोषण आहारामध्ये करण्याचा निर्णय केलेला आहे. आणि त्याच सोबत केळीच्या प्रोसेसिंगकरीता एक महामंडळ हे तयार करण्याची नुकतीच आपण घोषणा केलेली आहे. जरूर त्याच्यामध्ये सगळ्यात जास्त आपल्याला मदत हे जैनसाहेबच करणार आहेत.



# प्रयोगशील झाल्याशिवाय प्रगतीशील होता येत नाही

## पुरस्कार विजेते प्रगतीशील शेतकरी विजय इंगळे यांचे अनुभवाचे बोल

**लाख असतील धर्मवेड्या,**
**हजार असतील जाती,**
**तुले माले पोसणारी एकच काळी काळी माती।**

रामराम शेतकरी बंधुंनो, मी विदर्भातील कापसाचा शेतकरी. विदर्भाची माझी माती कापसाची आणि कापसाच नाव आपल्या कपाळावर कोरलेला माझा विदर्भ. आताच आपण माझी एक छोटीशी डॉक्युमेंटरी पाहिली. आपण सगळे प्रगतीशील शेतकरी आहात, सुज्ञान शेतकरी आहात त्यामुळे तुम्हाला काही मार्गदर्शनाची गरज नाही. मी कापसाचा शेतकरी असल्यामुळे कापसावर फार प्रेम करतो. कापसावरची एक छोटीशी माझे साहित्यातील गुरु डॉक्टर विठ्ठल वाघ यांची एक कविता आहे-

**पराटीच्या डांगोडांगी रंगारंगाईचे फुलं,**
**पोरीसोरीच्या कानात जसे डूलतात डूल।**
**नोका म्हणू पराटीले होते गोंडेईचा फार,**
**लेकरवाळीचे ते लेक खेती अंगाखांद्यावर।**
**पराटीच्या नख्खीतून आला कापूस फुलून,**
**चारी बोटावर क्रिश्न लोणी राहे ला झेलून।**
**पराटीच्या डांगोडांगी रंगारंगाईचे फुलं।**

१९७६ ला मी मॅट्रीक झालो, डॉक्टर बनण्याच स्वप्न माझ्या मनात होत परंतु वडीलांची हालाखीची परिस्थिती त्यावेळेसची. बीएएमएस कॉलेजला ॲडमिशन झाली, ॲडमिशन करून घरी आलो, प्राध्यापकांनी अस सांगितल प्रिन्सिपलनी की एक-दोन दिवसात फी घेऊन तुम्ही या. मी घरी आलो आणि वडीलांना आनंद अस सांगितल की मला डॉक्टरसाठी ॲडमिशन मिळाली. ते एक शब्दही बोलले नाहीत. खाली मान घालून त्यांनी मला अस म्हटल की चार भाऊ, दोन बहिणी, असे तुम्ही सहा जणं झाल, आम्ही दोघं नवरा-बायको आठ, आणि दोन बैलं, असा आपला पुरा प्रपंच. मला फार उशीरा कळल की त्यांनी आपल्या प्रपंचात बैलही पकडले होते. कस भागेल, पाच हजार रुपये कोठून आणू? डॉक्टर बनण्याच स्वप्न एका सेकंदात विरल होत. आणि हळूहळू त्यांनी मला शेतीत जुंपल, काळ्या मातीची सेवा करण्याच ओझ माझ्या खांद्यावर टाकल आणि मी काळ्या मातीची सेवा करायला लागलो.

मित्रहो, प्रयोगशील झाल्याशिवाय प्रगतीशील होता येणार नाही. म्हणून मी मनात एक गाठ बांधून ठेवली की आपल्याला प्रयोगशील व्हायच. १९९७-९८ ला बीटी कापसाची भारतातली पहिली ट्रायल माझ्या चितळवाडी गावातून, माझ्या शेतातून या देशात आली. आणि २००१ ला ठिबकच विदर्भातल कापसाच पहिल ठिबक माझ्या शेतावर आल आणि तिथून आमच्या विदर्भात कापसाच

ठिबक वाढल. मी नुसत माझ्या शेतावरच थांबलो नाही तर या तंत्रज्ञानाचा, या ठिबकचा, या बीटी कॉटनचा संपुर्ण विदर्भाला या महाराष्ट्राला फायदा व्हावा यासाठी बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांना मार्गदर्शन सुद्धा केल. माझ कुटुंब माझे वडीलभाऊ, माझे वडील, राजू, संजू यांनी माझ्यावर खुप विश्वास टाकला आणि त्या विश्वासानं मी शेती करू लागलो. स्वतःच पोट भरण्यासाठी काळ्या मातीच हुड हुडकू लागलो, तिच्या काळ्या अंगावर हिरव्या रांगोळ्या कोरू लागलो, साहेब होता होता जगाचा पोशींदा झालो. आणि आज पद्मश्री आप्पासाहेब पवार यांच्या नावाचा सन्मान घेऊन भाग्यवंत झालो.

मला जो आज सन्मान मिळाला हा सन्मान खऱ्या अर्थानं माझा नाही माझ्या शेतीचा आहे, माझ्या मातीचा आहे, माझ्या गावातील माझ्या पंचकृषीतील संपुर्ण शेतकऱ्यांचा आहे. वेळ कमी आहे मला फक्त पाचच मिनीटं बोलायला सांगितल म्हणून मी शेवटी अस म्हणतो मी कोणाचेच आभार मानणार नाही–

आभाराचे भार कशाला, आता फुलांचे हार कशाला,
हृदयातच घर बांधू या, अशा घराला दार कशाला।

हा जो आजचा पुरस्कार आहे हा पुरस्कार मी माझ्या वडीलांना समर्पित करतो. त्या विषयी दोन शब्द थोडेसे सांगतो. लहान असताना जेव्हा आकाशात ढग यायचे आम्ही असे बाहेर खेळत असू आणि त्या ढगांत वेगवेगळे चित्र आम्ही शोधत असू. प्रत्येक जण करतय लहानपणी तस. त्या ढगात कधी उंट दिसायचा, कधी हत्ती दिसायचा, कधी जिराफ दिसायचा. आनंदाने धावतधावत आजीच्या जवळ यायचो आणि आजीला म्हणायचो आजी आज मी ढगात उंट पाहिला, आजी मी आज ढगात हत्ती पाहिला. अस आजी सांगत असते की हो दिसते. मग अचानक त्या दिवशी गावातला एक माणूस मरण पावला, मला लहानपणी मेलेला माणूस पाहिल्यावर फार भिती वाटायची. मी धावत धावत आजीच्या कुशीत जायचो आणि तिच्या पदराखाली लपून राहायचो. मग तिला प्रश्न केला की आजी हा माणूस कुठे गेला? तर ती म्हणायची ढगात गेला. हळूहळू मोठा झालो शेती करायला लागलो, वडीलांसमोर शेती केली आणि काही दिवसानं वडील गेले. आता ढग येतात, आजीने सांगितलेल्या गोष्टींची आठवणही येते, आणि त्या ढगात आता मी माझा बाप शोधतो.

हा पुरस्कार मी माझ्या इथं नसलेल्या पण ढगाच्या पालखीत बसलेल्या माझ्या बापास अर्पण करतो.



सौ. जयश्रीताई विजय इंगळे यांचा सौ. ज्योतीभाभी अशोक जैन या साडीचोळी देऊन सत्कार करताना, शेजारी शरद पवार, देवेंद्र फडणवीस आणि भवरलाल जैन



# माझा जन्म आण्णासाहेब व आप्पासाहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी

## पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांचे भावोद्गार

सर्वप्रथम आदरणीय आप्पासाहेबांच्या स्मृतीला नमन करतो. आपल्या सगळ्यांच्या मनामध्ये एक प्रश्न पडला आहे की मुख्यमंत्र्यांच फक्त स्वागत केल, साहेबांच केल नाही. साहेबांच स्वागत केल नाही अस नाही पण साहेबांनी हे सांगितल की भवरलालजी वेळ वाचवा आणि मलाही वाचवा. याच्यात आणि म्हणून पहिल्यांदीच आपल्याशी हा खुलासा देवून टाकला.

मित्रहो, बारा वर्ष झाली या पुरस्काराला. त्याची छोटीशी बारा वर्षाची जी तपपुर्ति आहे त्याची एक फिल्म आपण बघणारच आहात, त्याच्याबद्दल जास्त मी बोलणार नाही. आणि या पुरस्काराची सुरुवात म्हणजे १९८५ मध्ये मी ज्यावेळेला आप्पासाहेबांना आणि आण्णासाहेब शिंदेंना अमेरिकेत एका एक्झिबीशनमध्ये भेटलो तिथे झाली अस समजा. या दोन्ही कृषीपुत्रांनी त्यावेळी मला अस सांगितल की भवरलालजी तुम्ही इथे कशासाठी आलात? म्हटलं मला अस वाटत आहे की हे ड्रीप इरिगेशन वगैरे जे काही आहे त्याची आज नाही उद्या महाराष्ट्राला आणि सगळ्या देशालाच आवश्यकता भासणार आहे त्याच्यामुळे मी या इंडस्ट्रीमध्ये पडायला विचार करतो आहे, दोघांनी. मला त्या वेळेला सांगितल की भवरलालजी तुमचा जन्म आमची स्वप्न पुर्ण करण्यासाठी झालेला आहे अस आम्हाला वाटत आहे. कारण आम्ही हे स्वप्न इतके दिवस झाले पाहतो आहे की अस कोणीतरी करायला पाहिजे. पाण्याच फार दुर्भिक्ष्य होणार आहे आणि त्याच्यामुळे तुम्ही ते करायला निघाला त्याच्याबद्दल खुप आनंद आहे. त्याच्यानंतर आप्पासाहेबांनी खर पाहायला गेले तर जलतपस्वी म्हणून प्रत्येक गावामध्ये प्रत्येक ठिकाणी जाऊन दीड-दीड, दोन-दोन तास भाषणं देऊन ड्रीप इरिगेशन ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन हे कस आहे याचा प्रचार-प्रसार करायला निस्वार्थपणे सुरुवात केली. अनेक समारंभांमध्ये ते बोलले. आणि ज्यावेळेला मी या व्यवसायात पडलो त्यावेळेला आप्पासाहेब इथे कित्तेकवेळा येऊन गेले, मी बारामतीमध्ये जाऊन आलो, सगळ बघितल, बरोबरच राहिलो आणि त्याच्यामुळे ज्यावेळेला आप्पासाहेब गेले तेव्हा मला मनापासून अस वाटल की आप्पासाहेबांची स्मृती ही कायम रहावी यादृष्टीने आपण एक पुरस्काराची सुरुवात करू या. पुरस्काराच्या सुरुवातीचा प्रस्ताव साहेबांकडे मांडला. म्हणाले भवरलालजी तुम्ही पुरस्कार करणार असाल तर मी कोण तुम्हाला सांगणारा! तुम्हाला जे करायच असेल ते तुम्ही करा. आणि त्या पद्धतीने या पुरस्काराची सुरुवात झाली.

मला सांगायला खुप आनंद वाटते की सहा अत्यंत लायक आणि आधुनिक शेतीचा ध्यास वसा घेतलेल्या शेतकऱ्यांना हा पुरस्कार मिळाला. आज आपण तो सोहळा आणखी साजरा करणार आहोत. आजचे पुरस्कार साहेब तुमच्या समोरच आहेत. पुरस्कारार्थींना सन्मानार्थींना मी नमन करतो. आपल्या सगळ्यांच स्वागत करतो. आणि या व्यासपीठावर बसलेल्या इतर मान्यवरांच सुद्धा स्वागत करतो. वेळ वाचवण्यासाठी या सगळ्यांच व्यक्तिशः स्वागत करण्याचे टाळतो आहे, मला माफ करा.

No. : MH/MR/South-283/2014-16
of every month posted on 15th, 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849


# रब्बी हंगामातील पिकांच्या अधिक उत्पादनाचा महामंत्र

# जैन सुक्ष्म सिंचन तंत्र!



- कांदा, मका, गहू, हरभरा, ज्वारी, सूर्यफुल, ह्या पिकांकरीता जैन ठिबक.
- कमी पाण्यात, कमी वेळेत, कमी विजेत अधिक क्षेत्र सिंचनाखाली.
- रात्री सुध्दा पिकांना पाणी देता येते.
- पाणी वापरामध्ये ५० ते ६० % बचत होते.
- जमिनीत कायम वाफसा, पिकांना पाण्याचा ताण पडत नाही.
- रासायनिक खतांचा अधिक कार्यक्षम वापर.
- भरघोस उत्पादन व अधिक नफा.
- विक्री नंतरची सेवा व शेतीविषयक समस्यांसंबंधी मार्गदर्शन.

**हवं तेव्हा, हवं तिथं, हवं तितकंच पाणी पुरवणार पिकांना.**

जैन ठिबक®
पाणी थेंबानं, पीक जोमानं!




फोन: ०२५७-२२५८०११; फॅक्स: ०२५७ - २२५८१११; ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com

कार्यालये: अहमदनगर: ९४२२७७२२४८, अमरावती: ९४०३६९५८५६, अकोला: ९४०३०८०१३२, औरंगाबाद: ९४२२७७८९१२, बुलढाणा: [illegible] बीड: ९४२२१७६८२७; लातूर: ९४२२७७३३८९; जालना: ९४२२७७५९१२, जळगाव ९४२२७७४९१८, नंदुरबार: ९४०३७७०६२१, नाशिक: [illegible] नांदेड: ९४०३०८०१०९, मुंबई - ठाणे: ९८७०९९०७५४, नागपूर: ९४२२२८३४०८, वर्धा: ९४२२७७४९२७, यवतमाळ: ९४२२७७१९०९, पंढरपूर: [illegible] पुणे: ९४२२२८३४२९; रत्नागिरी: ९४२२२९२१०८, सांगली: ९४०३७७०६००, सातारा: ९४२२७७४१८६; सोलापूर: ९४०३६९५८८६, कोल्हापूर: [illegible]